# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल : approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/९२५३

दिनांक : २०/०४/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय : स्थानिक निवड समितीने शिफारस करुन नियुक्त केलेल्या उमेदवारांचे व तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करण्याबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, Dtd. 8 March, 2019
२) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली दि. ०१ मार्च, २०१९ यांच्या संदर्भातील भारतीय राजपत्र क्र. ८२.
३) शासन निर्णय क्र. सावेआ–१११९/प्र.क्र. ४४/१९/तां.शि. २, दि. ११ सप्टेंबर, २०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ३ याचे अवलोकन करुन शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या उमेदवारांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत या विभागात सादर करण्याबाबत आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) विनाअनुदानित महाविद्यालये/संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२०–२१ या वर्षासाठी स्थानिक निवड समितीच्या अहवालानुसार नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवाराच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दि. ०१ जून ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत सादर करावे आणि निवड समितीची सभा आयोजित करण्यात आलेल्या दिनांकापासून ७२ तासाच्या आत निवड समिती अहवाल विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सादर करणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक निवड समितीद्वारे निवड केलेल्या उमेदवारांचे प्रस्ताव दि. ०१ जून ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधीत रुजू दिनांकापासून ३० दिवसाच्या आत अथवा दि. ३० सप्टेंबर, २०२० पर्यंतच सादर करावे. ऑनलाईन पध्दतीने शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव भरुन व निवड समिती अहवाल याची हार्ड कॉपी व सीडी (PDF Only) ३० दिवसांच्या आत सादर करावी. **(सीडी नसल्यास प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत)** दि. ३० सप्टेंबर, २०२० नंतर आलेले प्रस्ताव व निवड समिती अहवालावर कोणतीही कार्यवाही होणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) महाविद्यालये/संस्थाकडून ज्या उमेदवाराची २०१९–२० या शैक्षणिक वर्षासाठी स्थानिक निवड समितीमार्फत/तासिका तत्वावर नियुक्ती होऊन शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केले असतील असे उमेदवार किंवा ज्यांना शिक्षक मान्यता मिळाली असेल असे शिक्षक त्यांनी महाविद्यालय/संस्था सोडले असेल अशा शिक्षक उमेदवाराची नावे संबंधित महाविद्यालये/संस्थेच्या टिचर प्रोफाईल मधून नावे वगळण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालये/संस्थेची राहील.

३) अनुदानित महाविद्यालयासाठी स्थानिक निवड समितीद्वारे निवड केलेल्या उमेदवारांचे प्रस्ताव हे रुजू दिनांकापासून ३० दिवसाच्या आत व निवड समितीचा अहवाल ७२ तासाच्या आत वर्षभर स्वीकारण्यात येतील.

४) तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांच्या मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्यासाठी शासनाचे दि. १४ नोव्हेंबर, २०१८ चे निर्णय निर्गमित केलेला असून त्यात नमूद केल्याप्रमाणे नियम व अटी पूर्ण करीत असलेल्या संस्था व महाविद्यालयानी दि. ०१ जुलै, २०२० ते ३१ ऑगस्ट, २०२० या कालावधीत ऑनलाईन भरुन याच कालावधीत त्याची हार्ड कॉपी व सीडी या विभागात सादर करावी. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना जास्तीत जास्त नऊ महिने अथवा त्या शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत शिक्षक मान्यता देण्यात येईल.

उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीमध्ये शैक्षणिक वर्षासाठीचे तासिका तत्वावरचे प्रस्ताव सादर करावे. सदर तारखेनंतर शैक्षणिक वर्षासाठीचे व तासिका तत्वावरचे प्रस्ताव सादर केल्यास व अपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास त्यावर या विभागाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

29/04/2020

सहायक कुलसचिव,
(शिक्षक मान्यता कक्ष)